**वाचा :-** 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 1 एप्रिल 2010
2) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन 1099/प्र.क्र.2/99/सेवा-3 दिनांक 20/7/01
3) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा 3, दिनांक 5/7/2010
4) शासन निर्णय वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक : वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3, दि. 9 डिसेंबर 2016
5) पदोन्नती समितीची सभा इतिवृत्त दिनांक 17/9 /2018.

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
**-आरोग्य विभाग-**
**जा.क्र.आरोग्य/आस्था**3/557 ते 559/2018.
**नाशिक दिनांक :**21/9 /2018

**आदेश**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 मंत्रालय, मुंबई 32 दिनांक 1 एप्रिल 2010 नुसार गट क व गट ड (पुर्वीचे वर्ग-3 व वर्ग-4) जिल्हा परिषदेमधील कर्मचा-यांना **सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** लागु करणेत आली आहे. पहिल्या लाभानंतर 12 वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणुन मंजुर करणेबाबत नमुद आहे. तसेच सदरचा लाभ मंजुर करताना शासन निर्णय क्रमांक वेतन 1199/प्र.क्र.2/99/सेवा-3 मंत्रालय मुंबई-32 दिनांक 20 जुलै 2001 नुसार कार्यवाही करणेबाबत नमुद आहे.

शासन निर्णय वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक : वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3, दि. 9 डिसेंबर 2016 अन्वये दिनांक 1/10/2006 ते 31/3/2010 या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय केला आहे. त्यानुसार शासन निर्णयातील जाहिर केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन खालील औषध निर्माण अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन पदोन्नतीच्या साखळीतील पदोन्नतीचे पद उपलब्ध नसल्याने व सदरचे पद एकाकी असल्याने आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वेतनश्रेणी रु.5200-20200 ग्रेड पे- 3100 मध्ये शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा 3, दिनांक 5/7/2010 अन्वये मुळ पदाच्या/विद्यमान ग्रेड वेतना व्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन रुपये 450/- खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

| अ. नं. | तालुका | कर्मचारी नांव | नियुक्ती दिनांक | कालबध्द पदोन्नती पहिला लाभ मंजूर केल्याचा दिनांक (12 वर्षे लाभ) | आश्वासीत प्रगतीयोजना दुसरा लाभ मंजूर करावयाचा दिनांक | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | देवळा | नरहर नारायण राणे | 19/7/1974 | 1/10/1994 | 1/10/2006 | 31/5/08 |
| 2 | दिंडोरी | फारुक अहमद शरीफखान | 18/11/1978 | 1/10/1995 | 1/10/2007 | 30/6/08 |
| 3 | सुरगाणा | सुभाष तुकाराम कुमावत | 26/06/1978 | 1/10/1995 | 1/10/2007 | 30/6/09 |

## अटी व शर्ती

१) या योजनेचा लाभ संबंधित पदावरील 24 वर्षाच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होईल.
२) या योजनेचा लाभ पूर्ण सेवेत फक्त एक वेळ अनुज्ञेय आहे.
३) आश्वासीत प्रगती योजना लाभ मंजूर केलेवर वेतन निश्चिती शासन निर्णय वित्त विभाग, क्र.वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा 3, दिनांक 5/7/2010 नुसार करण्यांत यावी.
४) वेतननिश्चितीचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृत्तीवेतन विषयक/ कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांकरिताच म्हणजेच निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान तसेच रजा रोखीकरण या लाभ मंजूरीच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील. संबंधित अधिकारी /कर्मचारी यांना दुसरा लाभ मंजूरीच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

वरील कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकावरुन त्यांचे सेवेत हजर झालेची तारीख पडताळणी करुन संबधित कर्मचाऱ्यास सदर योजनेचा लाभ नमुद केलेनुसार देण्यात यावा व सदर आदेशाची व दिलेल्या लाभांची नोंद संबधित कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति,
संबंधित कर्मचारी
द्वारा:- संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,
प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती,सर्व संबंधित
तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,-----
प्रत :- म. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.नाशिक.
:- ज्ञापन नस्ती / कार्यालयीन प्रत